# येशूला विचारलेले
# १०० प्रश्न
# आणि त्याने दिलेली उत्तरे

संग्राहक
डॉ. रंजन केळकर

# प्रस्तावना

प्रभू येशूला लोक नेहमी प्रश्न विचारत असत. त्याचे विरोधक त्याला त्याच्याच शब्दांत पकडायचा प्रयत्न करीत. त्याचे शिष्य त्याच्याकडून अर्थबोध करून घेत. सामान्य माणसे त्यांच्या वैयक्तिक समस्या घेऊन त्याच्याकडे येत. अशुद्ध आत्मेदेखील त्याला प्रश्न करीत असत.

येशूला विचारल्या गेलेल्या शंभर प्रश्नांची आणि त्याने दिलेल्या उत्तरांची चार शुभवर्तमानांत नोंद आहे. ही प्रश्नोत्तरे ह्या ई-पुस्तकात मी संग्रहित केली आहेत. त्यांवर मी माझे स्वतःचे भाष्य केलेले नाही. प्रत्येक प्रश्न कोणी विचारला आणि तो विचारण्यामागे त्याची कोणती भूमिका होती हे समजावे म्हणून नव्या कराराचे संदर्भ दिले आहेत.

आजच्या काळातसुद्धा आपल्या मनात असंख्य प्रश्न येऊ शकतात जे कोणाला तरी विचारावेसे वाटतात. त्यांची समाधानकारक उत्तरे मात्र मिळतातच असे नाही. विशेष म्हणजे आपले प्रश्न नवीन नसतात. तेच प्रश्न दुसऱ्या कोणी येशूला आधीच विचारलेले आहेत. आणि त्यांची उत्तरे त्याने देऊन ठेवलेली आहेत. ती आपल्यासाठीपण आहेत. म्हणून ह्या ई-पुस्कातील प्रश्नोत्तरे वाचकांना उपयोगी होतील असे मला वाटते.

पुणे, ८ नोव्हेम्बर २०१२ - डॉ. रंजन केळकर

ह्या ई-पुस्कातील सर्व उतारे रत्नाकर हरी केळकर ह्यांनी केलेल्या नव्या कराराच्या ग्रीक-मराठी भाषांतरातून घेतलेले आहेत.

Copyright © 2012 R. R. Kelkar

Email: kelkar_rr@yahoo.com

# अनुक्रमणिका

१ तू कोण आहेस?
२ तू कोण आहेस?
३ तू कुठे राहतोस?
४ तू कुठला आहेस?
५ तू देवाचा पुत्र आहेस का?
६ तू ख्रिस्त आहेस का?
७ तू ख्रिस्त, देवाचा पुत्र आहेस का?
८ तू मशिहा आहेस का?
९ तू राजा आहेस का?
१० तू यहुद्यांचा राजा आहेस का?
११ तू यहुद्यांचा राजा आहेस का?
१२ तू अब्राहामापेक्षा मोठा आहेस का?
१३ पित्याचे घर
१४ येशूचा बाप्तिस्मा
१५ संदेष्ट्याचा अवमान
१६ मोठी आणि पहिली आज्ञा
१७ सनातन जीवन
१८ सनातन जीवन
१९ सनातन जीवन
२० सार्वकालिक जीवन
२१ अरुंद दार
२२ पुन्हा जन्म घेणे
२३ पुन्हा जन्म घेणे
२४ जीवनाची भाकर
२५ जीवनाची भाकर
२६ जीवनाची भाकर
२७ जिवंत पाणी
२८ जिवंत पाणी
२९ जिवंतांचा देव
३० येशूची वचने
३१ येशूचा अधिकार
३२ मंदिर
३३ कोणी पाप केले
३४ उचित न्याय

# अनुक्रमणिका

३५ दगडमाराची शिक्षा
३६ अशुद्ध आत्मा
३७ अशुद्ध आत्मा
३८ सूटपत्र
३९ सूटपत्र
४० प्रकाश
४१ प्रकाशाचे पुत्र
४२ पाच हजारांना भोजन
४३ पाच हजारांना भोजन
४४ चार हजारांना भोजन
४५ क्षमा
४६ पापांची क्षमा
४७ पवित्र आत्मा
४८ पिता
४९ मनुष्याचा पुत्र
५० विश्वास
५१ विश्वास
५२ विश्वास
५३ स्वर्गाच्या राज्यात सर्वांत मोठा
५४ मी ह्या जगाचा नाही
५५ तू कोठे जातोस?
५६ तू कोठे जातोस?
५७ मार्ग, सत्य आणि जीवन
५८ मी पित्याकडे जातो
५९ मी आणि पिता एक आहोत
६० अग्नीने संहार
६१ देवाचे राज्य
६२ देवाचे राज्य
६३ देवाची स्तुती
६४ देवाचे काम
६५ देवाला सर्व काही शक्य
६६ शेजारी
६७ अंधळे वाटाड्ये
६८ विश्वासू दास

# अनुक्रमणिका


६९ दाखले
७० कर देणे
७१ टिकणारे अन्न
७२ स्वर्गातील धन
७३ प्रतिफळ
७४ शब्बाथ
७५ शब्बाथ
७६ एलिया
७७ अब्राहाम
७८ सत्य स्वतंत्र करील
७९ काळजी
८० काळजी
८१ आत्मिक अंधत्व
८२ चालीरीती
८३ उपास
८४ येशू शिष्यांचे पाय धुतो
८५ तयारी
८६ विश्वासघात
८७ विश्वासघात
८८ विश्वासघात
८९ तरवार
९० येशूची चौकशी
९१ येशूची चौकशी
९२ येशूची चौकशी
९३ येशूची चौकशी
९४ सत्य
९५ अधिकार
९६ त्याचे तुला काय?
९७ पुनरुत्थित येशू
९८ शेवटचा काळ
९९ शेवटचा काळ
१०० काळ आणि समय

# १ तू कोण आहेस?

संदर्भः प्रे. कृ. ९:१-६

प्रश्न विचारणाराः शौल

प्रश्नः “प्रभू, तू कोण आहेस?”

येशूचे उत्तरः “तू ज्याचा छळ करतोस तो येशू मी आहे. तर ऊठ, आणि नगरात जा; आणि तू काय केलं पाहिजे ते तुला सांगण्यात येईल.”

# २ तू कोण आहेस?

संदर्भः योहान ८:२५-२६

प्रश्न विचारणारेः यहुदी

प्रश्नः “तू कोण आहेस?”

येशूचे उत्तरः “मी तुम्हाला तेच प्रारंभापासून सांगतो. तुमच्याविषयी बोलायला आणि न्याय करायला पुष्कळ गोष्टी माझ्याजवळ आहेत; पण ज्यानं मला धाडलं तो खरा आहे आणि मी त्याच्याकडून ऐकलेल्या गोष्टी जगाला सांगतो.”

# ३ तू कुठे राहतोस?

संदर्भः योहान १:३८
प्रश्न विचारणारेः योहानाचे शिष्य
प्रश्नः “रब्बी, (म्हणजे गुरू) आपण कुठं राहता?”
येशूचे उत्तरः “या आणि पहा.”

# ४ तू कुठला आहेस?

संदर्भः योहान १९:८
प्रश्न विचारणाराः पिलात
प्रश्नः “तू कुठला आहेस?”
येशूचे उत्तरः (येशूने उत्तर दिले नाही.)

# ५ तू देवाचा पुत्र आहेस का?

संदर्भः लूक २२:७०
प्रश्न विचारणारेः वडील, वरिष्ठ याजक व शास्त्री
प्रश्नः “मग तू देवाचा पुत्र आहेस काय?”
येशूचे उत्तरः “मी आहे हे तुम्ही म्हणता.”

# ६ तू ख्रिस्त आहेस का?

संदर्भः लूक २२:६६-६८

प्रश्न विचारणारेः वडील, वरिष्ठ याजक व शास्त्री

प्रश्नः "तू ख्रिस्त असलास तर आम्हाला सांग."

येशूचे उत्तरः "मी तुम्हाला सांगितलं तर तुम्ही विश्वास ठेवणार नाही; आणि मी विचारलं तर तुम्ही उत्तर देणार नाही. पण ह्यापुढे मनुष्याचा पुत्र देवाच्या सामर्थ्याच्या उजवीकडे बसेल."

# ७ तू ख्रिस्त, देवाचा पुत्र आहेस का?

संदर्भः मत्तय २६:६३-६४, मार्क १४:६१-६२

प्रश्न विचारणाराः श्रेष्ठ याजक

प्रश्नः "मी तुला जिवंत देवाची शपथ घालतो, तू आम्हाला सांग; तू काय ख्रिस्त, देवाचा पुत्र आहेस?"

येशूचे उत्तरः "तुम्ही म्हणालात! तरी मी तुम्हाला सांगतो, तुम्ही ह्यापुढं पहाल की, मनुष्याचा पुत्र सामर्थ्याच्या उजवीकडे बसला आहे, आणि आकाशातल्या ढगांवर येत आहे."

# ८ तू मशिहा आहेस का?

संदर्भः मत्तय ११:२-६, लूक ७:१८-२३

प्रश्न विचारणारेः बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाने धाडलेले दोन शिष्य

प्रश्नः “आपण जो येणार आहे तो आहात की, आम्ही दुसऱ्याची वाट पहावी?”

येशूचे उत्तरः “जा, आणि तुम्ही ज्या गोष्टी ऐकत आहा आणि पहात आहा त्या योहानाला सांगा, अंधळे पाहतात आणि पांगळे चालतात, मेलेले उठवले जातात आणि दीनांना सुवार्ता सांगण्यात येते. आणि ज्या कोणाला माझ्यात अडथळा होणार नाही तो धन्य.”

# ९ तू राजा आहेस का?

संदर्भः योहान १८:३७

प्रश्न विचारणाराः पिलात

प्रश्नः “तर तू राजा आहेस काय?”

येशूचे उत्तरः “मी राजा आहे असं आपण म्हणता. मी सत्याची साक्ष द्यावी ह्याकरता मी जन्मास आलो, आणि ह्याकरता मी जगात आलो. जो कोणी सत्याचा आहे तो माझा आवाज ऐकतो.”

# १० तू यहुद्यांचा राजा आहेस का?

संदर्भः मार्क १५:२, लूक २३:३, योहान १८:३३-३६

प्रश्न विचारणाराः पिलात

प्रश्नः "तू यहुद्यांचा राजा आहेस काय?"

येशूचे उत्तरः "माझं राज्य ह्या जगातलं नाही. माझं राज्य ह्या जगातलं असतं तर यहुद्यांच्या हाती मी दिला जाऊ नये म्हणून माझे कामदार लढले असते; पण माझं राज्य आता इथलं नाही."

# ११ तू यहुद्यांचा राजा आहेस का?

संदर्भः मत्तय २७:११

प्रश्न विचारणाराः सुभेदार

प्रश्नः “तू यहुद्यांचा राजा आहेस काय?”

येशूचे उत्तरः “आपण म्हणाला.”

# १२ तू अब्राहामापेक्षा मोठा आहेस का?

संदर्भः योहान ८:५२-५६

प्रश्न विचारणारेः यहुदी

प्रश्नः “आमचा पिता अब्राहाम मेला; त्याच्यापेक्षा तू मोठा आहेस काय? आणि संदेष्टे मेले; तू स्वतःला काय बनवतोस?”

येशूचे उत्तरः “मी स्वतःचं गौरव केलं तर माझं गौरव काही नाही, पण जो तुमचा देव आहे असं ज्याच्याविषयी तुम्ही म्हणता तो माझा पिता माझं गौरव करतो. तरी, तुम्ही त्याला जाणलेलं नाही, पण मी त्याला ओळखतो. आणि मी जर म्हटलं की, मी त्याला ओळखीत नाही, तर मी तुमच्यासारखा लबाड होईन. पण, मी त्याला ओळखतो, आणि त्याचं वचन पाळतो. माझा दिवस बघायला तुमचा पिता अब्राहाम उल्लासला; त्यानं तो बघितला आणि तो आनंदित झाला.”

# १३ पित्याचे घर

संदर्भः लूक २:४१-५२

प्रश्न विचारणारीः येशूची आई

प्रश्नः “बाळ, तू आमच्याशी असा का वागलास? बघ, तुझे पिता आणि मी दुःखित होऊन तुला शोधीत होतो.”

येशूचे उत्तरः “तुम्ही मला शोधीत होता हे कसं? मी माझ्या पित्याच्या घरात असलो पाहिजे हे तुम्ही ओळखलं नाही काय?”

# १४ येशूचा बाप्तिस्मा

संदर्भः मत्तय ३:१३-१७

प्रश्न विचारणाराः बाप्तिस्मा करणारा योहान

प्रश्नः “मलाच तुझ्याकडून बाप्तिस्मा घ्यायची गरज आहे; आणि तूच माझ्याकडे येतोस?”

येशूचे उत्तरः “आता येऊ दे; कारण, आपण असं सर्व न्यायीपण पूर्ण करावं हे उचित आहे.”

# १५ संदेष्ट्याचा अवमान

संदर्भः मत्तय १३:५४-५८, मार्क ६:१-६, लूक ४:१६-३०

प्रश्न विचारणारेः लोक

प्रश्नः "ह्याच्यात ह्या गोष्टी कुठून आल्या? ह्याला दिलेलं ज्ञानीपण काय आहे? आणि ह्याच्या हातून असे चमत्कार होतात?

येशूचे उत्तरः "कोणी संदेष्टा आपल्या स्वतःच्या देशात, स्वतःच्या नातलगात आणि स्वतःच्या घरी असल्याशिवाय त्याचा अवमान होत नाही."

# १६ मोठी आणि पहिली आज्ञा

संदर्भः मत्तय २२:३५-४०, मार्क १२:२८-३४

प्रश्न विचारणाराः एक शास्त्री

प्रश्नः “गुरू, नियमशास्त्रात कोणती आज्ञा मोठी आहे?”

येशूचे उत्तरः “ ‘तुझा देव परमेश्वर ह्याच्यावर तू आपल्या पूर्ण अंतःकरणाने, पूर्ण जिवाने आणि पूर्ण मनाने प्रीती कर’; ही मोठी आणि पहिली आज्ञा आहे, आणि हिच्यासारखी दुसरी ही की, ‘तू जशी आपल्यावर तशीच आपल्या शेजाऱ्यावर प्रीती कर’. ह्या दोन आज्ञांवर सर्व नियमशास्त्र आणि संदेष्टे अवलंबून आहेत.”

# १७ सनातन जीवन

संदर्भः योहान ८:४८-५१

प्रश्न विचारणारेः यहुदी

प्रश्नः "तू शोमरोनी आहेस, आणि तुझ्यात भूत आहे, हे आम्ही बरोबर म्हणतो ना?"

येशूचे उत्तरः "माझ्यात भूत नाही; पण मी माझ्या पित्याला मान देतो आणि तुम्ही माझा अपमान करता. पण मी माझं स्वतःचं गौरव पहात नाही; जो ते पाहतो आणि न्याय करतो असा एक आहे. मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, कोणी माझी वचनं पाळील तर तो कधीच मरण पाहणार नाही."

# १८ सनातन जीवन

संदर्भः योहान ६:६६-७१

प्रश्न विचारणाराः शिमोन पेत्र

प्रश्नः “प्रभू, आम्ही कोणाकडे जाणार? तुझ्याजवळ सनातन जीवनाची वचनं आहेत. आणि आम्ही विश्वास ठेवतो, आणि जाणतो की, तू देवाचा पवित्र आहेस.”

येशूचे उत्तरः “मी तुम्हा बारा जणांना निवडलं ना? आणि तुमच्यात एक जण सैतान आहे.”

# १९ सनातन जीवन

संदर्भः मत्तय १९:१६-२३, मार्क १०:१७-२२, लूक १८:१८-२३

प्रश्न विचारणाराः एक धनवान मनुष्य

प्रश्नः “उत्तम गुरू, मी सनातन जीवन हे वतन मिळावं म्हणून मी काय करू?”

येशूचे उत्तरः “मला उत्तम का म्हणतोस? एका देवाशिवाय कोणी उत्तम नाही.

# २० सार्वकालिक जीवन

संदर्भः लूक १०:२५-२८

प्रश्न विचारणाराः एक शास्त्री

प्रश्नः “गुरू, मी सार्वकालिक जीवन हे वतन मिळवायला काय करू?”

येशूचे उत्तरः “नियमशास्त्रात काय लिहिलं आहे? तू कसं वाचतोस?”.... “तू बरोबर उत्तर दिलंस. हे कर, आणि तू जगशील.”

# २१ अरुंद दार

संदर्भः मत्तय ७:१३-१४, लूक १३:२३-२४,

प्रश्न विचारणाराः एक जण

प्रश्नः "प्रभू, तारले जातील ते थोडेच आहेत काय?"

येशूचे उत्तरः "अरुंद दारानं आत जायला झटा, कारण, मी तुम्हाला सांगतो, पुष्कळ आत जायला पाहतील आणि जाऊ शकणार नाहीत."

# २२ पुन्हा जन्म घेणे

संदर्भः योहान ३:१-८

प्रश्न विचारणाराः निकदेम

प्रश्नः "मनुष्य मोठा झाल्यानंतर कसा जन्मू शकेल? त्याला आपल्या आईच्या उदरात पुन्हा जाववेल काय? आणि जन्म घेववेल काय?"

येशूचे उत्तरः "मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, कोणीही मनुष्य पाण्यापासून आणि आत्म्यापासून जन्मल्याशिवाय तो देवाच्या राज्यात येऊ शकत नाही. देहापासून जन्मलेला देह आहे, आणि आत्म्यापासून जन्मलेला आत्मा आहे. तुम्हाला पुन्हा जन्मलं पाहिजे, असं मी तुम्हाला म्हटलं ह्याचं आश्चर्य करू नका. वारा पाहिजे तिकडे वाहतो आणि तुम्ही त्याचा आवाज ऐकता, पण तो कोठून येतो आणि कुठं जातो हे तुम्हाला कळत नाही. आत्म्यापासून जन्मलेल्या, प्रत्येक मनुष्याचं असंच आहे."

# २३ पुन्हा जन्म घेणे

संदर्भः योहान ३:९-१५

प्रश्न विचारणाराः निकदेम

प्रश्नः “ह्या गोष्टी कशा होऊ शकतील?”

येशूचे उत्तरः “तुम्ही इस्राएलाचे गुरू आहा, आणि ह्या गोष्टी जाणत नाही? मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, आम्ही जे जाणतो ते आम्ही बोलतो, आणि आम्ही जे पाहिले आहे त्याची साक्ष देतो; पण तुम्ही आमची साक्ष स्वीकारीत नाही. मी पृथ्वीवरच्या गोष्टी जर तुम्हाला सांगितल्या तर तुम्ही विश्वास ठेवीत नाही; मग, मी स्वर्गातल्या गोष्टी जर तुम्हाला सांगितल्या तर तुम्ही विश्वास कसा ठेवाल? जो मनुष्याचा पुत्र स्वर्गातून आला त्याच्याशिवाय कोणीही मनुष्य स्वर्गात चढलेला नाही. आणि मोशेने रानात जसा साप वर चढवला तसाच मनुष्याचा पुत्र वर चढवला गेला पाहिजे, ह्यासाठी की, जो कोणी विश्वास ठेवतो त्याला त्याच्या ठायी सनातन जीवन मिळावं.”

# २४ जीवनाची भाकर

संदर्भः योहान ६.५२-५९

प्रश्न विचारणारेः यहुदी

प्रश्नः "हा आम्हाला आपला देह कसा खायला देऊ शकेल?"

येशूचे उत्तरः "मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, तुम्ही जोवर मनुष्याच्या पुत्राचा देह खात नाही, आणि त्याचं रक्त पीत नाही तोवर तुम्हाला तुमच्यात जीवन नाही. जो माझा देह खातो आणि माझं रक्त पितो त्याला सनातन जीवन आहे. आणि मी त्याला शेवटच्या दिवशी पुन्हा उठवीन.
कारण, खरोखर, माझा देह अन्न आहे, आणि,खरोखर, माझं रक्त पेय आहे. जो माझा देह खातो आणि माझं रक्त पितो तो माझ्यात राहतो आणि मी त्याच्यात राहतो. जिवंत पित्यानं जसं मला पाठवलं, आणि मी जसा पित्यामुळं जगतो तसा जो मला खातो तोही माझ्यामुळं जगेल. हीच स्वर्गातून उतरलेली भाकर आहे. जी पूर्वजांनी खाल्ली आणि ते मेले तशी ही नाही. जो कोणी ह्या भाकरीतून खातो तो सर्वकाळ जगेल."

# २५ जीवनाची भाकर

संदर्भः योहान ६:३०-४०

प्रश्न विचारणारेः लोक

प्रश्नः “मग आपण कोणतं चिन्ह दाखवता की, ते बघून, आम्ही आपल्यावर विश्वास ठेवावा? आपण कोणतं करता?[३१] आमच्या पूर्वजांनी अरण्यात मान्ना खाल्ला; कारण 'त्याने त्यांना स्वर्गातील भाकर खायला दिली' असं लिहिलेलं आहे.”

येशूचे उत्तरः “मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, मोशेनं तुम्हाला स्वर्गातील भाकर दिली नाही; पण माझा पिता तुम्हाला स्वर्गातील खरी भाकर देतो. कारण देवाची भाकर स्वर्गातून उतरून जगाला जीवन देत आहे.”

# २६ जीवनाची भाकर

**संदर्भः** योहान ६:४१-५१

**प्रश्न विचारणारेः** यहुदी

**प्रश्नः** “हा येशू योसेफाचा मुलगा नाही काय? ह्याच्या बापाला आणि आईला आम्ही ओळखतो. आता हा कसं म्हणतो, ‘मी स्वर्गातून उतरलो आहे’?”

**येशूचे उत्तरः** “तुम्ही आपआपल्यात कुरकुर करू नका. ज्या पित्यानं मला धाडलं त्यानं कोणाला ओढल्याशिवाय तो माझ्याकडे येऊ शकत नाही. आणि, मी त्याला शेवटच्या दिवशी पुन्हा उठवीन. आणि ते सगळे देवाने शिकवलेले होतील’, असं संदेष्ट्यात लिहिलं आहे, म्हणून जो पित्याकडून ऐकून शिकला आहे असा प्रत्येक मनुष्य माझ्याकडे येतो. जो देवापासून आहे त्यान पित्याला पाहिलं आहे. त्याच्याशिवाय कोणी पित्याला पाहिलं आहे असं नाही. मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, जो माझ्यावर विश्वास ठेवतो त्याला सनातन जीवन आहे. मीच जीवनाची भाकर आहे. तुमच्या पूर्वजांनी रानात मान्ना खाल्ला आणि ते मेले. पण स्वर्गातून उतरलेली भाकर अशी आहे की, कोणीही ती खावी आणि मरू नये. मी स्वर्गातून उतरलेली जिवंत भाकर आहे. ह्या भाकरीतून कोणी खाईल तर तो सर्वकाळ जिवंत राहील. आणि, जगाच्या जीवनासाठी मी जी भाकर देईन ती माझा देह आहे.”

# २७ जिवंत पाणी

संदर्भः योहान ४:११-२६

प्रश्न विचारणारीः शोमरोनी बाई

प्रश्नः “महाराज, आपल्याजवळ शेंदायला काही नाही, आणि विहीर खोल आहे, मग आपल्याजवळ ते जिवंत पाणी कुठून? आपले पूर्वज याकोब ह्यांच्याहून आपण मोठे आहा काय? त्यांनी ही विहीर आम्हाला दिली; आणि ते स्वतः, त्यांचे पुत्र, आणि त्यांची जनावरं हिच पाणी पीत असत.”

येशूचे उत्तरः “जो कोणी हे पाणी पिईल त्याला पुन्हा तहान लागेल, पण जो मनुष्य मी त्याला देईन ते पाणी पिईल त्याला कधीही तहान लागणार नाही. तर मी जे पाणी त्याला देईन ते त्याच्या ठायी जीवनासाठी उपळत्या पाण्याचा झरा होईल.”

# २८ जिवंत पाणी

संदर्भः योहान ४:१-१०

प्रश्न विचारणारीः शोमरोनी बाई

प्रश्नः “आपण यहुदी असून माझ्याजवळ, एका शोमरोनी बाईजवळ प्यायला मागता, हे असं कसं?”

येशूचे उत्तरः “देवाचं दान काय आहे, आणि मला प्यायला दे असं तुला म्हणणारा कोण आहे, हे तुला समजलं असतं तर तू त्याच्याजवळ मागितलं असतंस आणि त्यानं तुला जिवंत पाणी दिलं असतं.”

# २९ जिवंतांचा देव

संदर्भः मत्तय २२:२३-३२, मार्क १२:१८-२७, लूक २०:२७-३८

प्रश्न विचारणारेः सदोकी

प्रश्नः "तर ती पुनरुत्थानात त्या सातांतून कोणाची बायको होईल? कारण ती त्या सर्वांची झाली होती."

येशूचे उत्तरः "तुम्ही शास्त्रलेख आणि देवाचं सामर्थ्य जाणत नाही, म्हणून चुकत आहा. कारण ते पुनरुत्थानात लग्न करीत नाहीत किंवा लग्न करून देत नाहीत. पण स्वर्गातील देवदूतांसारखे होतात. पण मेलेल्यांच्या पुन्हा उठण्याविषयी देवानं तुम्हांला सांगितलं आहे ते तुम्ही वाचलेलं नाही काय? त्यानं म्हटलं आहे की, 'मी अब्राहामाचा देव, इसहाकाचा देव, आणि याकोबाचा देव आहे.' देव हा मृतांचा देव नाही, पण जिवंतांचा आहे."

# ३० येशूची वचने

संदर्भः योहान ६:६०-६४

प्रश्न विचारणारेः शिष्य

प्रश्नः "हे वचन कठिण आहे; हे कोणाला ऐकवेल?"

येशूचे उत्तरः "ह्याचा तुम्हाला अडथळा होतो काय? आणि तुम्ही जर मनुष्याच्या पुत्राला तो आधी होता तिथं वर जाताना पहाल तर? आत्मा जीवन देणारा आहे, देह काही लाभ घडवीत नाही. मी तुमच्याशी बोललो ती वचनं आत्मा आणि जीवन आहेत. पण तुमच्यात असे काही आहेत की, ते विश्वास ठेवीत नाहीत."

# ३१ येशूचा अधिकार

संदर्भः मत्तय २१:२३-३७, मार्क ११:२६-३३, लूक २०:१-८

प्रश्न विचारणारेः वरिष्ठ याजक, शास्त्री आणि वडील

प्रश्नः “तू कोणत्या अधिकारानं ह्या गोष्टी करतोस? किंवा ह्या गोष्टी करायला कोणी तुला हा अधिकार दिला?”

येशूचे उत्तरः “मी तुम्हाला एक गोष्ट विचारतो, मला उत्तर द्या, आणि मी ह्या गोष्टी कोणत्या अधिकारानं करतो हे मी तुम्हाला सांगेन. योहानाचा बाप्तिस्मा हा स्वर्गाकडून होता की मनुष्यांकडून? मला उत्तर द्या.”

# ३२ मंदिर

संदर्भः योहान २:१८-२१

प्रश्न विचारणारेः यहुदी

प्रश्नः“तू हे करतोस तर आम्हाला चिन्ह काय दाखवतोस?”

येशूचे उत्तरः “तुम्ही हे मंदिर मोडा आणि मी ते तीन दिवसांत उभं करीन.”

# ३३ कोणी पाप केले

संदर्भः योहान ९:१-५

प्रश्न विचारणाराः शिष्य

प्रश्नः "रब्बी, कोणी पाप केलं? ह्यानं, किंवा ह्याच्या आईबापांनी, म्हणून हा अंधळा जन्मला?"

येशूचे उत्तरः "ह्यानं, किंवा ह्याच्या आईबापांनी पाप केलं असं नाही, पण देवाची कामं ह्याच्यात प्रगट व्हावीत म्हणून असं झालं. ज्यानं मला धाडलं त्याची कामं आपण दिवस असेपर्यंत केली पाहिजेत. रात्र येते तेव्हा कोणीही काम करू शकत नाही. मी जगात आहे तोवर मी जगाचा प्रकाश आहे."

# ३४ उचित न्याय

संदर्भः योहान ७.२०-२४

प्रश्न विचारणारेः लोक

प्रश्नः "तुझ्यात भूत आहे. कोण तुला ठार मारायला टपतो आहे?"

येशूचे उत्तरः "मी एक काम केलं, आणि तुम्ही सगळे आश्चर्य करता. मोशेनं ह्याकरता, तुम्हाला सुनत लावून दिली. तरी ती मोशेपासून नाही, पण पूर्वजांपासून आहे. आणि तुम्ही शब्बाथ दिवशी मनुष्याची सुनत करता. मोशेच नियमशास्त्र मोडू नये म्हणून जर शब्बाथ दिवशी मनुष्याला सुनत मिळते, तर मी शब्बाथ दिवशी एका मनुष्याला सर्वांगी निरोगी केलं म्हणून तुम्ही माझ्यावर रागावता काय? दिसतं त्यावरून न्याय करू नका,पण उचित न्यायानं न्याय करा."

# ३५ दगडमाराची शिक्षा

संदर्भः योहान ८:१-११

प्रश्न विचारणारेः शास्त्री व परोशी

प्रश्नः "गुरू, ही बाई व्यभिचारकर्मात धरली गेली. आता अशांना दगडमार करावा, म्हणून मोशेनं नियमशास्त्रात आम्हाला आज्ञा दिली आहे. पण आपण काय म्हणता?"

येशूचे उत्तरः "तुमच्यात जो कोणी निष्पाप असेल त्यानं प्रथम तिच्यावर एक दगड टाकावा."

# ३६ अशुद्ध आत्मा

संदर्भः मार्क १:२१-२८, लूक ४:३३-३५

प्रश्न विचारणाराः अशुद्ध आत्मा लागलेला मनुष्य

प्रश्नः "अरे नासरेथकर येशू, तुला आमच्याशी काय करायचं आहे? तू आम्हाला नष्ट करायला आलास काय? तू कोण आहेस हे मी जाणतो. देवाचा पवित्र तू आहेस."

येशूचे उत्तरः "तोंड बंद कर आणि ह्याच्यामधून बाहेर नीघ."

# ३७ अशुद्ध आत्मा

संदर्भः मत्तय ८:२८-३४, मार्क ५:१-२०, लूक ८:२६-३९

प्रश्न विचारणाराः अशुद्ध आत्मा लागलेला मनुष्य

प्रश्नः “येशू, परात्पर देवाच्या पुत्रा, तुला माझ्याशी काय करायचं आहे? मी तुला देवापुढं शपथ घालतो, तू मला पिडू नकोस.”

येशूचे उत्तरः “अरे अशुद्ध आत्म्या, ह्या मनुष्यातून बाहेर नीघ.”

# ३८ सूटपत्र

संदर्भः मत्तय १९:३-६, मार्क १०:२-३

प्रश्न विचारणारेः परोशी

प्रश्नः"कोणी कोणत्याही कारणावरून आपल्या बायकोला सोडणं योग्य आहे काय?"

येशूचे उत्तरः "तुम्ही हे वाचलं नाही काय की, ज्यानं प्रारंभापासून त्यांना उत्पन्न केलं त्यानं त्यांना नर आणि नारी असं केलं. आणि म्हटलं की, 'ह्या कारणामुळे पुरुष आपल्या बापाला आणि आईला सोडील आणि आपल्या बायकोशी जडून राहील; आणि ती दोघं एकदेह होतील'? तर मग ती दोन नाहीत, पण एकदेह आहेत; म्हणून देवानं जे जोडलं आहे ते मनुष्यानं तोडू नये."

# ३९ सूटपत्र

संदर्भः मत्तय १९:७-९, मार्क १०:४-९

प्रश्न विचारणारेः परोशी

प्रश्नः“मग सोडचिठ्ठी देऊन तिला सोडायला मोशेनं आज्ञा का दिली?”

येशूचे उत्तरः “तुमच्या मनाच्या कठिणपणामुळं, मोशेनं तुम्हाला तुमच्या बायका सोडायला परवानगी दिली; पण प्रारंभापासून तसं झालं नाही. आणि मी तुम्हाला सांगतो, जो कोणी आपल्या बायकोला जारकर्माच्या कारणाशिवाय सोडील, आणि दुसरीशी लग्न करील तो व्यभिचार करतो.”

# ४० प्रकाश

संदर्भः योहान ११:७-१०

प्रश्न विचारणारेः शिष्य

प्रश्नः “रब्बी, यहूदी आपल्याला आताच दगडमार करू पहात होते आणि आपण पुन्हा तिकडे जाऊ पाहता?”

येशूचे उत्तरः “दिवसाचे बारा तास असतात ना? कोणी दिवसा चालल्यास तो अडखळणार नाही, कारण त्याला ह्या जगाचा प्रकाश दिसतो; पण कोणी रात्री चालल्यास तो अडखळतो, कारण त्याच्यात प्रकाश नाही.”

# ४१ प्रकाशाचे पुत्र

संदर्भः योहान १२:३१-३६

प्रश्न विचारणाराः लोक

प्रश्नः "ख्रिस्त सर्वकाळ राहील असं आम्ही नियमशास्त्रातून ऐकलं आहे. आणि, आपण कसं म्हणता की, मनुष्याचा पुत्र वर चढवला गेला पाहिजे? हा मनुष्याचा पुत्र कोण आहे?"

येशूचे उत्तरः "आणखी अल्पकाळ तुमच्याबरोबर प्रकाश आहे; तुम्हाला प्रकाश आहे तोवर चाला; नाहीतर, अंधार तुम्हाला गाठील; जो अंधारात चालतो त्याला आपण कुठं जातो हे कळत नाही. तुम्हाला प्रकाश आहे तोवर प्रकाशावर विश्वास ठेवा; म्हणजे तुम्ही प्रकाशाचे पुत्र व्हाल."

# ४२ पाच हजारांना भोजन

संदर्भः मत्तय १४:१३-२१, मार्क ६:३०-४४, लूक ९:१०-१७, योहान ६:१-१५

प्रश्न विचारणारेः शिष्य

प्रश्नः "आम्ही जाऊन, दोनशे दिनारांच्या भाकरी विकत घेऊन त्यांना खायला देऊ काय?"

येशूचे उत्तरः "तुमच्याजवळ किती भाकरी आहेत? जा आणि बघा."

# ४३ पाच हजारांना भोजन

संदर्भः योहान ६:१-१५

प्रश्न विचारणारेः शिष्य

प्रश्नः “इथं एक लहान मुलगा आहे. त्याच्याजवळ पाच ज़वाच्या भाकरी, आणि दोन मासळ्या आहेत; पण इतक्या लोकांत त्या काय आहेत?”

येशूचे उत्तरः “लोकांना बसवा.”

# ४४ चार हजारांना भोजन

संदर्भः मत्तय १५:३२-३९, मार्क ८:१-१०

प्रश्न विचारणारेः शिष्य

प्रश्नः "एवढ्या मोठ्या जमावाला खाऊ घालायला, रानात आम्हाला एवढ्या भाकरी कुठून मिळणार?"

येशूचे उत्तरः "तुमच्याजवळ किती भाकरी आहेत?"

# ४५ क्षमा

संदर्भः मत्तय १८:२१-२२

प्रश्न विचारणाराः पेत्र

प्रश्नः “प्रभू, माझ्या भावानं किती वेळा माझ्याविरुद्ध पाप करावं, आणि मी त्याला क्षमा करावी? सात वेळा?”

येशूचे उत्तरः “मी तुला म्हणत नाही की, सात वेळा; पण सातांच्या सत्तर वेळा.”

# ४६ पापांची क्षमा

संदर्भः मार्क २:१-१२, लूक ५:१७-२६

प्रश्न विचारणारेः शास्त्री

प्रश्नः "हा असं का बोलतो? हा दुर्भाषण करतो! कोण एका देवाशिवाय पापांची क्षमा करू शकतो?"

येशूचे उत्तरः "तुम्ही का आपल्या मनात असल्या गोष्टीचा विचार करता? ह्या पक्षघाती मनुष्याला 'तुझ्या पापांची क्षमा केली आहे' असं म्हणणं, किंवा 'ऊठ, तुझं बाजलं उचल आणि चाल', असं म्हणणं अधिक सोपं आहे? पण मनुष्याच्या पुत्राला पृथ्वीवर पापांची क्षमा करायचा अधिकार आहे हे तुम्हाला समजावं."

# ४७ पवित्र आत्मा

संदर्भः योहान १४:२२-२६

प्रश्न विचारणाराः यहुदा

प्रश्नः “प्रभू, असं काय झालं की, आपण आम्हाला प्रगट व्हाल आणि जगाला नाही?”

येशूचे उत्तरः “कोणीही माझ्यावर प्रीती करील तर तो माझं वचन पाळील; आणि त्याच्यावर माझा पिता प्रीती करील; आणि आम्ही त्याच्याकडे येऊ, आणि त्याच्याकडे आमचं वसतीचं ठिकाण करू. जो माझ्यावर प्रीती करीत नाही तो माझी वचनं पाळीत नाही. आणि तुम्ही जे वचन ऐकता ते माझं नाही पण ज्यानं मला धाडलं त्या पित्याचं आहे. मी तुमच्याबरोबर रहात असताना मी ह्या गोष्टी तुम्हाला सांगितल्यात. पण पिता ज्याला माझ्या नावानं धाडील तो कैवारी म्हणजे पवित्र आत्मा तुम्हाला सर्व गोष्टी शिकवील; आणि मी ज्या गोष्टी तुम्हाला सांगितल्यात त्या सर्व गोष्टींची तुम्हाला आठवण देईल.

# ४८ पिता

संदर्भः योहान ८:१९

प्रश्न विचारणारेः परोशी

प्रश्नः “तुझा पिता कुठं आहे?”

येशूचे उत्तरः “तुम्ही मला किंवा माझ्या पित्यालाही ओळखीत नाही. तुम्ही मला ओळखलं असतं तर माझ्या पित्यालाही ओळखलं असतं.”

# ४९ मनुष्याचा पुत्र

संदर्भः योहान ९:३५-३८

प्रश्न विचारणाराः अंधळा मनुष्य

प्रश्नः "आणि, प्रभू, तो कोण आहे की, मी त्याच्यावर विश्वास ठेवू?"

येशूचे उत्तरः "तू त्याला पहात आहेस आणि तोच तुझ्याशी बोलत आहे."

# ५० विश्वास

संदर्भः मत्तय २१:१८-२२, मार्क ११:२०-२५

प्रश्न विचारणारेः शिष्य

प्रश्नः “हे अंजिराचं झाड लगेच कसं वाळल?”

येशूचे उत्तरः “मी तुम्हाला सत्य सांगतो, तुमच्यात जर विश्वास असेल, आणि तुम्ही संशय धरणार नाही, तर तुम्ही हे अंजिराच्या झाडाला कराल एवढंच नाही, पण, तुम्ही जर ह्या डोंगराला म्हणाल, ‘तू इथून काढला जाऊन समुद्रात टाकला जा’ तर तसं होईल. आणि तुम्ही ज्या काही गोष्टी प्रार्थनेत, विश्वास ठेवून मागाल, त्या सर्व तुम्हाला मिळतील.”

# ५१ विश्वास

संदर्भः मत्तय २१:१८-२२, मार्क ११:२०-२५

प्रश्न विचारणारेः शिष्य

प्रश्नः “हे अंजिराचं झाड लगेच कसं वाळल?”

येशूचे उत्तरः “मी तुम्हाला सत्य सांगतो, तुमच्यात जर विश्वास असेल, आणि तुम्ही संशय धरणार नाही, तर तुम्ही हे अंजिराच्या झाडाला कराल एवढंच नाही, पण, तुम्ही जर ह्या डोंगराला म्हणाल, ‘तू इथून काढला जाऊन समुद्रात टाकला जा’ तर तसं होईल. आणि तुम्ही ज्या काही गोष्टी प्रार्थनेत, विश्वास ठेवून मागाल, त्या सर्व तुम्हाला मिळतील.”

# ५२ विश्वास

संदर्भः मत्तय १७:१९-२०, मार्क ९:१७-२९

प्रश्न विचारणारेः शिष्य

प्रश्नः "आम्ही का ते (भूत) काढू शकलो नाही?"

येशूचे उत्तरः "तुमच्या अल्पविश्वासामुळं! मी तुम्हाला सत्य सांगतो, तुमच्यात जर मोहरीच्या दाण्याएवढा विश्वास असेल, तर तुम्ही ह्या डोंगराला म्हणाल, 'इथून पुढच्या जागेवर सरक' आणि तो सरकेल; तुम्हाला काही अशक्य होणार नाही."

# ५३ स्वर्गाच्या राज्यात सर्वांत मोठा

संदर्भः मत्तय १८:१-५

प्रश्न विचारणारेः शिष्य

प्रश्नः “स्वर्गाच्या राज्यात सर्वांत मोठा कोण?”

येशूचे उत्तरः “मी तुम्हाला सत्य सांगतो, तुमचा पालट होऊन तुम्ही बालकांसारखे झाल्याशिवाय स्वर्गाच्या राज्यात तुम्ही प्रवेश करणार नाही. कारण जो कोणी स्वतःला ह्या बालकांप्रमाणे लीन करील तो स्वर्गाच्या राज्यात सर्वांत मोठा आहे.

# ५४ मी ह्या जगाचा नाही

संदर्भः योहान ८:२१-२४

प्रश्न विचारणारेः यहुदी

प्रश्नः “हा आत्महत्या करणार काय? कारण हा म्हणतो की, ‘मी जाईन तिकडे तुम्हाला येता येणार नाही’.”

येशूचे उत्तरः “तुम्ही खालचे आहा, मी वरचा आहे; तुम्ही ह्या जगाचे आहा, मी ह्या जगाचा नाही. म्हणून मी तुम्हाला म्हटले, तुम्ही तुमच्या पापांत मराल; कारण, मी तो आहे असा तुम्ही विश्वास ठेवला नाही, तर तुम्ही तुमच्या पापांत मराल.”

# ५५ तू कोठे जातोस?

संदर्भः योहान १३:३१-३६

प्रश्न विचारणाराः शिमोन पेत्र

प्रश्नः "प्रभू, तू कुठं जातोस?"

येशूचे उत्तरः "मी जाईन तिकडे, आता, तुला माझ्यामागं येता येणार नाही; पण नंतर तू माझ्यामागं येशील."

# ५६ तू कोठे जातोस?

संदर्भः योहान १३:३७-३८

प्रश्न विचारणाराः शिमोन पेत्र

प्रश्नः “प्रभू, मला तुझ्यामागं का येता येणार नाही? मी तुझ्याकरता माझा जीव देईन.”

येशूचे उत्तरः “तू माझ्याकरता तुझा जीव देशील काय? मी तुला सत्य सत्य सांगतो, तू मला तीनदा नाकारशील तोपर्यंत कोंबडा आरवणार नाही.”

# ५७ मार्ग, सत्य आणि जीवन

संदर्भः योहान १४:१-७

प्रश्न विचारणाराः थोमा

प्रश्नः "प्रभू, आपण कुठं जाता ते आम्हाला माहीत नाही; मग मार्ग कसा माहीत आहे?"

येशूचे उत्तरः "मार्ग, सत्य आणि जीवन मी आहे. माझ्याद्वारे आल्याशिवाय कोणी पित्याकडे येत नाही. तुम्ही मला ओळखलं असतं तर माझ्या पित्यालाही ओळखलं असतं. तुम्ही त्याला आता ओळखता आणि तुम्ही त्याला पाहिलं आहे."

# ५८ मी पित्याकडे जातो

संदर्भः योहान १६:१६-२८

प्रश्न विचारणारेः शिष्य

प्रश्नः “हा हे आपल्याला काय म्हणतो? ‘थोडा वेळ, आणि तुम्ही मला पाहणार नाही, आणि पुन्हा, थोडा वेळ आणि तुम्ही मला पहाल;’ आणि, ‘कारण मी पित्याकडे जातो.’ ”

येशूचे उत्तरः “आणि म्हणून, आता तुम्हाला दुःख आहे; पण मी तुम्हाला पाहीन, आणि तुमचं मन आनंदित होईल, आणि तुमच्यापासून तुमचा आनंद कोणी हिरावणार नाही. आणि त्या दिवशी तुम्ही माझ्याजवळ काही मागणार नाही. मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, तुम्ही माझ्या नावानं पित्याजवळ काही मागाल तर तो ते तुम्हाला देईल. अजून तुम्ही माझ्या नावानं काही मागितलं नाही; तुम्ही मागा, आणि तुमचा आनंद पूर्ण व्हावा म्हणून तुम्हाला मिळेल..... मी पित्याकडून निघालो आणि जगात आलो; पुन्हा, मी जग सोडतो आणि पित्याकडे जातो.”

# ५९ मी आणि पिता एक आहोत

संदर्भः योहान १०:२४-३०

प्रश्न विचारणारेः यहुदी

प्रश्नः “आपण कुठवर आमचं मन चळवणार? आपण जर ख्रिस्त असाल तर आम्हाला उघडपणे सांगा.”

येशूचे उत्तरः “मी तुम्हाला सांगितलं आणि तुम्ही विश्वास ठेवीत नाही. मी माझ्या पित्याच्या नावानं जी कामं करतो ती माझ्याविषयी साक्ष देतात. पण तुम्ही विश्वास ठेवीत नाही, कारण मी तुम्हाला म्हटल्याप्रमाणं तुम्ही माझ्या मेंढरांतले नाही. माझी मेंढरं माझी हाक ऐकतात, मी त्यांना ओळखतो, आणि ती माझ्यामागं येतात. आणि मी त्यांना सनातन जीवन देतो; त्यांचा कधीही नाश होणार नाही, आणि कोणी त्यांना माझ्या हातातून हिसकून घेणार नाही. मला देणारा माझा पिता सर्वांपेक्षा मोठा आहे, आणि माझ्या पित्याच्या हातातून कोणी हिसकून घेऊ शकत नाही. मी आणि पिता एक आहोत.”

# ६० अग्नीने संहार

संदर्भः लूक ९:५१-५५

प्रश्न विचारणारेः याकोब व योहान

प्रश्नः "प्रभू, आकाशातून अग्नीनं येऊन ह्यांचा संहार करावा, अशी आम्ही आज्ञा करावी अशी आपली इच्छा आहे काय?"

येशूचे उत्तरः (येशूने उत्तर दिले नाही.)

# ६१ देवाचे राज्य

संदर्भः लूक १७:२०-२१

प्रश्न विचारणारेः परोशी

प्रश्नः “देवाचं राज्य कधी येईल?”

येशूचे उत्तरः “देवाचं राज्य निरीक्षणात येणार नाही; आणि ‘इथं बघा’, किंवा ‘तिथं बघा’ असंदेखील ते म्हणणार नाहीत; कारण बघा, देवाचं राज्य तुमच्यात आहे.”

# ६२ देवाचे राज्य

संदर्भः लूक १७:३६-३७
प्रश्न विचारणारेः शिष्य
प्रश्नः “कुठं, प्रभू?”
येशूचे उत्तरः “जिथं मढं तिथं गिधाडं जमतील.”

# ६३ देवाची स्तुती

संदर्भः मत्तय २१:१४-१६

प्रश्न विचारणारेः वरिष्ठ याजक व शास्त्री

प्रश्नः “ही (मुले) काय बोलतात ते तू ऐकतोस काय?”

येशूचे उत्तरः “हो, आणि ‘बालकांच्या आणि तान्ह्यांच्या तोंडून तू स्तुती पूर्ण केलीस’ हे तुम्ही कधीच वाचलं नाही काय?”

# ६४ देवाचे काम

संदर्भः योहान ६:२८-२९

प्रश्न विचारणारेः लोक

प्रश्नः “आम्ही देवाची कामं करावीत म्हणून काय करावं?”

येशूचे उत्तरः “देवाचं काम हे आहे की, त्यानं ज्याला पाठवलं आहे त्याच्यावर तुम्ही विश्वास ठेवावा.”

# ६५ देवाला सर्व काही शक्य

संदर्भः मत्तय १९:२५-२६

प्रश्न विचारणारेः शिष्य

प्रश्नः “मग कोण तारला जाऊ शकेल?”

येशूचे उत्तरः “मनुष्यांना हे अशक्य आहे, पण देवाला सर्व गोष्टी शक्य आहेत.”

# ६६ शेजारी

**संदर्भः** लूक १०:२५-३७

**प्रश्न विचारणाराः** एक शास्त्री

**प्रश्नः** “आणि माझा शेजारी कोण?”

**येशूचे उत्तरः** “एक मनुष्य यरुशलेमहून खाली यरिहोकडे निघाला, आणि चोरांच्या गराड्यात पडला. त्यांनी त्याचे कपडे काढले, त्याला फटके लगावले, त्याला अर्धमेला सोडलं, आणि ते निघून गेले. आणि संयोगानं एक याजक त्या वाटेनं खाली आला, आणि त्यानं त्याला बघितलं तेव्हा तो दुसऱ्या बाजूकडून गेला. तसाच एक लेवी त्या ठिकाणी आला, तेव्हा त्यानं त्याला बघितलं आणि तो दुसऱ्या बाजूकडून गेला. पण, तो होता तिथं एक शोमरोनी प्रवास करीत आला; आणि त्यानं त्याला बघितलं तेव्हा त्याला त्याचा कळवळा आला. तो त्याच्याकडे गेला, आणि त्यानं त्याच्या जखमांवर तेल आणि द्राक्षारस ओतून त्या बांधल्या; त्याला आपल्या जनावरावर बसवून एका उतारशाळेत आणलं, आणि त्याची चांगली काळजी घेतली. आणि त्यानं दुसऱ्या दिवशी दोन दिनार काढून ते उतारशाळेच्या मालकाला दिले, आणि तो त्याला म्हणाला, ‘ह्याची चांगली काळजी घ्या, आणि तुम्ही जे काही अधिक खर्चाल ते मी पुन्हा परत येईन तेव्हा तुम्हाला देईन.’ तर जो चोरांच्या गराड्यात पडला त्याचा शेजारी ह्या तिघांतून कोण झाला असं तू समजतोस?”

# ६७ अंधळे वाटाड्ये

संदर्भः मत्तय १५:१२-१४

प्रश्न विचारणारेः शिष्य

प्रश्नः “परोश्यांनी हे बोलणं ऐकलं तेव्हा त्यांना अडथळा झाला हे आपण जाणता काय?”

येशूचे उत्तरः “माझ्या स्वर्गीय पित्यानं न लावलेलं प्रत्येक रोप उपटून टाकलं जाईल. त्यांना राहू द्या; ते अंधळे वाटाड्ये आहेत आणि अंधळा अंधळ्याला नेऊ लागला तर दोघेही खाड्यात पडतील.”

# ६८ विश्वासू दास

संदर्भः लूक १२:४१-४४

प्रश्न विचारणाराः पेत्र

प्रश्नः "प्रभू, तू हा दाखला आम्हाला सांगतोस की, सगळ्यांना सांगतोस?"

येशूचे उत्तरः "तर ज्याला त्याचा धनी आपल्या परिवारावर त्यांना त्याच्या अन्नाची वाटणी वेळेवर द्यावी म्हणून नेमील तो विश्वासू आणि विचारी कारभारी कोण आहे? जो दास त्याच्या धन्याला तो येईल तेव्हा तसं करताना आढळेल तो धन्य. मी तुम्हाला खरोखर सांगतो, तो आपल्या सर्व मालमत्तेवर त्याला नेमील."

# ६९ दाखले

संदर्भः मत्तय १३:१०-१५, मार्क ४:१०-१२, लूक ६:६-११

प्रश्न विचारणारेः शिष्य

प्रश्नः “आपण त्यांच्याशी दाखल्यांत का बोलता?”

येशूचे उत्तरः “स्वर्गाच्या राज्याची रहस्यं जाणणं तुम्हाला दिलेलं आहे, पण ते त्यांना दिलेलं नाही. कारण ज्या कोणाजवळ आहे त्याला दिलं जाईल आणि त्याच्याजवळ विपुल होईल. पण ज्या कोणाजवळ नाही, त्याच्याजवळ जे आहे तेपण त्याच्याकडून काढून घेतलं जाईल.म्हणून मी त्यांच्याशी दाखल्यांत बोलतो; कारण ते पाहताना पहात नाहीत, ऐकताना ऐकत नाहीत आणि विचारही करीत नाहीत.”

# ७० कर देणे

संदर्भः मत्तय २२:१५-२२, लूक २०:२०-२६

प्रश्न विचारणारेः हेर

प्रश्नः "कैसराला कर देणं योग्य आहे की नाही?"

येशूचे उत्तरः "कैसराचं आहे ते कैसराला द्या आणि देवाचं आहे ते देवाला द्या."

# ७१ टिकणारे अन्न

संदर्भः योहान ६:२२-२७

प्रश्न विचारणारेः लोक

प्रश्नः “रब्बी, आपण इकडे कधी आलात?”

येशूचे उत्तरः “मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, तुम्ही चिन्हं बघितलीत म्हणून नाही, पण त्या भाकरींतून खाल्लंत आणि तृप्त झालात म्हणून मला शोधता. नष्ट होणाऱ्या अन्नासाठी श्रम करू नका, पण सनातन जीवनाकरता, टिकणाऱ्या अन्नासाठी श्रम करा. मनुष्याचा पुत्र ते तुम्हास देईल, कारण त्याच्यावर देवपित्यानं शिक्का मारला आहे.”

# ७२ स्वर्गातील धन

संदर्भः मत्तय १९:१६-२३, मार्क १०:१७-२२, लूक १८:१८-२३

प्रश्न विचारणाराः एक धनवान मनुष्य

प्रश्नः "मी ह्या सगळ्या (आज्ञा) पाळल्या आहेत. अजून माझ्यात काय कमी आहे?"

येशूचे उत्तरः "तू जर पूर्ण होऊ इच्छीत असशील तर जा, तुझ्याजवळ जे असेल ते वीक, आणि गरिबांना दे; आणि तुला स्वर्गात धन मिळेल; चल, माझ्यामागं ये."

# ७३ प्रतिफळ

संदर्भः मत्तय १९:२७-२८

प्रश्न विचारणाराः पेत्र

प्रश्नः “मग, आम्ही सर्व सोडून तुझ्यामागं आलो आहोत त्या आम्हाला काय मिळेल?”

येशूचे उत्तरः “मी तुम्हाला सत्य सांगतो, नव्या उत्पत्तीत मनुष्याचा पुत्र आपल्या गौरवी राजासनावर बसेल, तेव्हा, माझ्यामागं आलेले तुम्हीसुद्धा बारा राजासनांवर बसाल आणि इस्राएलाच्या बारा कुळांचा न्याय कराल. आणि माझ्या नावाकरता, घरं किंवा भाऊ किंवा बहिणी, किंवा बाप किंवा आई किंवा मुलं, किंवा शेतं सोडणाऱ्या प्रत्येक मनुष्याला अनेकपट अधिक मिळेल आणि सनातन जीवन हे वतन मिळेल. पण पुष्कळ पहिले शेवटले होतील आणि शेवटले पहिले होतील.

# ७४ शब्बाथ

संदर्भः मत्तय १२:१-८, मार्क २:२३-२८, लूक ६:१-५,

प्रश्न विचारणारेः परोशी

प्रश्नः "शब्बाथ दिवशी जे करणं योग्य नाही ते तुम्ही का करता?"

येशूचे उत्तरः "जेव्हा दाविदाला, आणि त्याच्याबरोबर जे होते त्यांना भूक लागली होती तेव्हा त्यानं काय केलं हेही तुम्ही कधी वाचलेलं नाही काय? तो देवाच्या मंडपात कसा गेला, आणि ज्या समर्पित भाकरी केवळ याजकांशिवाय कोणी खाणं योग्य नाही त्या त्यानं कशा घेतल्या आणि खाल्ल्या, आणि जे त्याच्याबरोबर होते त्यांनाही कशा दिल्या? मनुष्याचा पुत्र शब्बाथाचा धनी आहे."

# ७५ शब्बाथ

संदर्भः मत्तय १२:९-१४, मार्क ३:१-६, लूक ६:६-११

प्रश्न विचारणारेः परोशी

प्रश्नः “शब्बाथ दिवशी कोणाला बरं करणं योग्य आहे काय?”

येशूचे उत्तरः “तुमच्यात कोण असा मनुष्य असेल की, त्याच्याजवळ एक मेंढरू आहे, आणि शब्बाथ दिवशी ते खाचेत पडलं तर तो त्याला धरून वर उचलणार नाही? मग मेंढरापेक्षा मनुष्य किती अधिक आहे? म्हणून शब्बाथ दिवशी चांगलं करणं योग्य आहे.”

# ७६ एलिया

संदर्भः मत्तय १७:१०-१३, मार्क ९:११-१३

प्रश्न विचारणारेः शिष्य

प्रश्नः “मग शास्त्री असं का म्हणतात की, एलिया प्रथम आला पाहिजे?”

येशूचे उत्तरः “एलिया खरोखर येणार आणि सर्व गोष्टी नीट करणार. [१]पण मी तुम्हाला सांगतो, एलिया आधीच आला असून त्यांनी त्याला ओळखलं नाही, पण त्यांना वाटलं तसं त्यांनी त्याला केलं. त्याचप्रमाणं मनुष्याचा पुत्रपण त्यांचं सोशील.”

# ७७ अब्राहाम

संदर्भः योहान ८:५४-५९

प्रश्न विचारणारेः यहुदी

प्रश्नः "तू अजून पन्नास वर्षांचा नाहीस आणि अब्राहामाला पाहिलंस काय?"

येशूचे उत्तरः "मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, अब्राहाम झाल्याअगोदर मी आहे."

# ७८ सत्य स्वतंत्र करील

संदर्भः योहान ८:३१-३८

प्रश्न विचारणारेः यहुदी

प्रश्नः “आम्ही अब्राहामाचे संतान आहो, आणि कधी कोणाचे दास झालो नाही. तू आम्हाला कसा म्हणतोस की, तुम्ही स्वतंत्र केले जाल?”

येशूचे उत्तरः “मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, जो कोणी पाप करतो तो पापाचा दास आहे. दास सदैव घरात रहात नाही;पुत्र सदैव घरात राहतो. म्हणून जर पुत्राने तुम्हाला स्वतंत्र केले तर तुम्ही, खरोखर, स्वतंत्र व्हाल. मी जाणतो की, तुम्ही अब्राहामाचे वंशज आहा, पण मला ठार मारायला टपला आहा; कारण माझ्या वचनाला तुमच्यात वाव मिळत नाही. मी माझ्या पित्याजवळ पाहिले ते बोलतो, आणि तुम्ही तुमच्या पित्याकडून ऐकले ते करता.”

# ७९ काळजी

संदर्भः लूक १०:३८-४२

प्रश्न विचारणारीः मार्था

प्रश्नः "प्रभू, माझ्या बहिणीनं मला एकटीला काम करायला सोडलं, ह्याची आपण काही पर्वा करीत नाही? तर तिला मला मदत करायला सांगा."

येशूचे उत्तरः "मार्था, मार्था, तू पुष्कळ गोष्टींच्या काळजीत आणि गोंधळात आहेस. पण एकाच गोष्टीची गरज आहे, कारण मरियेने चांगला भाग निवडला आहे; तो तिच्याकडून काढून घेतला जाणार नाही."

# ८० काळजी

संदर्भः मत्तय ८:२३-२७, मार्क ४:३५-४१, लूक ८:२२-२५

प्रश्न विचारणारेः शिष्य

प्रश्नः "गुरू, आपण बुडतोत, ह्याची आपल्याला काळजी नाही काय?"

येशूचे उत्तरः "तुम्ही असे भितरे कसे? तुमच्यात विश्वास नाही हे कसं?"

# ८१ आत्मिक अंधत्व

संदर्भः योहान ९:३९-४१

प्रश्न विचारणारेः परोशी

प्रश्नः “आम्ही पण अंधळे आहोत काय?”

येशूचे उत्तरः “तुम्ही जर अंधळे असता तर तुमच्याकडे पाप नसतं, पण आता तुम्ही म्हणता की, ‘आम्हाला दिसतं’, म्हणून तुमचं पाप राहतं.”

# ८२ प्रथा

संदर्भः मत्तय १५:१-२०, मार्क ७:१-२३

प्रश्न विचारणारेः शास्त्री व परोशी

प्रश्नः "आपले शिष्य पूर्वजांची प्रथा का मोडतात? कारण ते भाकरी खातात तेव्हा ते हात धूत नाहीत."

येशूचे उत्तरः "तुम्हीसुद्धा तुमच्या प्रथेनं देवाची आज्ञा का मोडता? ... ऐका आणि विचार करा. जे तोंड़ात जातं ते माणसाला विटाळवीत नाही, पण जे तोंडातून बाहेर येतं ते माणसाला विटाळवितं."

# ८३ उपास

संदर्भः मत्तय ९:१४-१७, मार्क २:१८-२२, लूक ५:३३-३९

प्रश्न विचारणारेः लोक

प्रश्नः “योहानाचे शिष्य आणि परोश्यांचे शिष्य का उपास करतात? आणि आपले शिष्य का करीत नाहीत?”

येशूचे उत्तरः “वऱ्हाड्यांबरोबर वर असताना ते उपास करू शकतील काय? त्यांच्याबरोबर वर असताना ते उपास करू शकणार नाहीत पण वर त्यांच्यामधून काढला जाईल तेव्हा ते दिवस येतील, आणि मग त्या दिवशी ते उपास करतील. कोणी कोऱ्या कापडाचं ठिगळ जुन्या कपड्यावर लावीत नाहीत; नाहीतर, भरीचा तुकडा त्यातून उसकटतो, नवा जुन्यातून, आणि फाटक अधिक वाईट होतं. आणि कोणी नवा द्राक्षारस जुन्या बुधल्यांत भरीत नाहीत; नाहीतर, तो द्राक्षारस ते बुधले फोडील. मग द्राक्षारस आणि बुधले नष्ट होतात. पण नवा द्राक्षारस नव्या बुधल्यात भरतात.”

# ८४ येशू शिष्यांचे पाय धुतो

संदर्भः योहान १३:४-१४

प्रश्न विचारणाराः पेत्र

प्रश्नः “प्रभू, तू माझे पाय धुतोस?”

येशूचे उत्तरः “मी काय करतो हे तू आता जाणत नाहीस, पण तुला पुढे कळेल.”

# ८५ तयारी

संदर्भः मत्तय २६:१७-१९, मार्क १४:१२-१६

प्रश्न विचारणारेः शिष्य

प्रश्नः "आपण वल्हांडणाचं भोजन करावं म्हणून आम्ही जाऊन कुठं तयारी करावी अशी आपली इच्छा आहे?"

येशूचे उत्तरः "नगरात जा, तिथं तुम्हाला एक पाण्याचा घडा घेतलेला मनुष्य भेटेल; त्याच्या मागोमाग जा. आणि जिथं तो आत जाईल तिथल्या घरधन्याला म्हणा, 'गुरू विचारतात की, मला माझ्या शिष्यांबरोबर वल्हांडणाचं भोजन करायला माझी उतरायची खोली कुठं आहे?' तो स्वतः तुम्हाला एक मोठी, सजवून तयार केलेली, माडीवरची खोली दाखवील. तिथं आपल्यासाठी तयारी करा."

# ८६ विश्वासघात

संदर्भः मत्तय २६:२०-२४, मार्क १४:१७-२०

प्रश्न विचारणारेः शिष्य

प्रश्नः “प्रभू, तो मी तर नाही?”

येशूचे उत्तरः “ज्यानं माझ्याबरोबर थाळीत हात भिजवला तोच मला धरून देईल. मनुष्याचा पुत्र तर, त्याच्याविषयी लिहिल्याप्रमाणं जात आहे, पण ज्या मनुष्याकडून मनुष्याचा पुत्र धरून दिला जाईल त्याला हळहळ! तो मनुष्य जन्मला नसता तर त्याच्यासाठी ते बरं झालं असतं.”

# ८७ विश्वासघात

संदर्भ: योहान १३:२१-२७

प्रश्न विचारणारे: योहान

प्रश्न: “प्रभू, तो कोण?”

येशूचे उत्तर: “मी ज्याला हा घास भिजवून देईन, तोच तो आहे.”

# ८८ विश्वासघात

संदर्भः मत्तय २६:२५

प्रश्न विचारणारेः यहुदा इस्कार्योत

प्रश्नः “रब्बी, तो मी तर नाही?”

येशूचे उत्तरः “तू म्हणालास.”

# ८९ तरवार

संदर्भः लूक २२:४७-५१

प्रश्न विचारणारेः लोक

प्रश्नः “प्रभू, आम्ही तरवार चालवावी काय?”

येशूचे उत्तरः “एवढं होऊ द्या.”

# ९० येशूची चौकशी

संदर्भः योहान १८:२२-२३

प्रश्न विचारणाराः एक कामदार

प्रश्नः "तू श्रेष्ठ याजकांना असं उत्तर देतोस काय?"

येशूचे उत्तरः "मी वाईट बोललो असलो तर वाइटाविषयी साक्ष दे; पण बरोबर बोललो असलो तर तू मला का मारतोस?"

# ९१ येशूची चोकशी

संदर्भः मत्तय २६:६२-६३, मार्क १४:६०-६१

प्रश्न विचारणाराः श्रेष्ठ याजक

प्रश्नः “तू काहीच उत्तर देत नाहीस; हे काय तुझ्याविरुद्ध साक्ष देत आहेत?”

येशूचे उत्तरः (येशूने उत्तर दिले नाही.)

# ९२ येशूची चोकशी

संदर्भः मत्तय २६.६७-६८

प्रश्न विचारणारेः लोक

प्रश्नः “अरे ख्रिस्ता, आमच्यासाठी भाकीत कर, तुला मारणारा कोण आहे?”

येशूचे उत्तरः (येशूने उत्तर दिले नाही.)

# ९३ येशूची चौकशी

संदर्भः मत्तय २७:१२-१४, मार्क १५:४-५

प्रश्न विचारणाराः पिलात

प्रश्नः “तुला ऐकू येत नाही? हे किती गोष्टींची तुझ्याविरुद्ध साक्ष देत आहेत?”

येशूचे उत्तरः (येशूने उत्तर दिले नाही.)

# ९४ सत्य

संदर्भः योहान १८:३८

प्रश्न विचारणाराः पिलात

प्रश्नः “सत्य काय आहे?”

येशूचे उत्तरः (येशूने उत्तर दिले नाही.)

# ९५ अधिकार

संदर्भः योहान १९:८-११

प्रश्न विचारणाराः पिलात

प्रश्नः “तू माझ्याशी बोलत नाहीस? मला तुला सोडून द्यायचा अधिकार आहे, आणि वधस्तंभावर खिळायचा अधिकार आहे हे तुला माहीत नाही काय?”

येशूचे उत्तरः “आपल्याला तो वरून दिलेला नसता तर आपल्याला माझ्यावर अधिकार नसता, म्हणून ज्यानं मला आपल्या हाती दिलं त्याचं पाप मोठं आहे.”

# ९६ त्याचे तुला काय?

संदर्भः योहान २१:२०-२३

प्रश्न विचारणाराः पेत्र

प्रश्नः “प्रभू, ह्याचं काय?”

येशूचे उत्तरः “मी येईपर्यंत त्यानं रहावं अशी जर माझी इच्छा असेल तर त्याचं तुला काय? तू माझ्यामागं ये.”

# ९७ पुनरुत्थित येशू

संदर्भः लूक २४:१८-३२

प्रश्न विचारणाराः क्लयपा

प्रश्नः "तुम्ही यरुशलेमात एकटे प्रवासी म्हणून राहता काय? आणि ह्या दिवसांत इथं घडलेल्या गोष्टी तुम्हाला कळल्या नाहीत?"

येशूचे उत्तरः "कोणत्या गोष्टी?"..... "अहो अज्ञानी! आणि संदेष्ट्यांनी सांगितलेल्या, सर्व गोष्टींवर विश्वास ठेवायला मनाचे मंद असलेले तुम्ही! ख्रिस्तानं ह्या गोष्टी सोसाव्यात आणि आपल्या गौरवात जावं ह्याचं अगत्य नव्हतं काय?"

# ९८ शेवटचा काळ

संदर्भः मत्तय २४:१-३, मार्क १३:१-२, लूक २१:५-६

प्रश्न विचारणाराः एक शिष्य

प्रश्नः "गुरू, बघा, कसले हे दगड, आणि कसल्या ह्या इमारती?"

येशूचे उत्तरः "तू ह्या मोठ्या इमारती पाहतोस ना? इथं पाडला जाणार नाही असा दगडावर दगड राहू दिला जाणार नाही."

# ९९ शेवटचा काळ

संदर्भः मत्तय २४:३-८, मार्क १३:३-११, लूक २१:७-९

प्रश्न विचारणारेः शिष्य

प्रश्नः "आम्हाला सांगा, ह्या गोष्टी केव्हा होतील? आणि आपल्या येण्याचं आणि युगाच्या समाप्तीचं चिन्ह काय?"

येशूचे उत्तरः "तुम्हाला कोणी फसवू नये म्हणून जपा. कारण माझ्या नावानं पुष्कळ जण येतील, आणि म्हणतील, 'मी ख्रिस्त आहे', आणि तुम्हाला फसवतील. आणि तुम्ही लढायांविषयी आणि लढायांच्या अफवा ऐकाल पण तुम्ही घाबरू नका. कारण ह्या गोष्टी झाल्या पाहिजेत. पण अजून शेवट नाही; कारण राष्ट्र राष्ट्रावर उठेल आणि राज्य राज्यावर उठेल; आणि जागजागी दुष्काळ उद्भवतील आणि भूकंप होतील. पण ह्या सर्व गोष्टी यातनांचा प्रारंभ होत.

# १०० काळ आणि समय

संदर्भः प्रे. कृ. १:६-८

प्रश्न विचारणाराः शिष्य

प्रश्नः “प्रभू, ह्या काळात, तू इस्राएलाचं राज्य पुन्हा प्रस्थापित करणार काय?”

येशूचे उत्तरः “पित्यानं जे काळ आणि समय आपल्या स्वतःच्या सत्तेत ठेवलेत ते कळणं तुमच्यासाठी नाही. पण पवित्र आत्मा तुमच्यावर येईल तेव्हा तुम्हाला सामर्थ्य मिळेल; आणि यरुशलेमात, सर्व यहूदियात, शोमरोनात आणि पृथ्वीच्या शेवटच्या भागापर्यंत तुम्ही माझे साक्षी व्हाल.”

# समाप्त